लोकमत





## - वैशिष्ट्ये -

- गेली ५३ वर्षे गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणारी संस्था. के.जी. पासून पीएच.डी. पर्यंत विविध शाखांमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध.
- अभियांत्रिकी महाविद्यालयातील सात (७) विद्याशाखांना व तंत्रनिकेतनच्या सहा (६) विद्याशाखांना NBA, New Delhi कडून मानांकन प्राप्त.
- अभियांत्रिकी महाविद्यालय व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास NAAC द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त.
- वरिष्ठ महाविद्यालय, नाशिक व चांदोरी यांना NAAC द्वारा मानांकन प्राप्त.
- सन २०२२-२३ पासून विद्यापीठ अनुदान आयोग (UGC, नवी दिल्लीकडून अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा (Autonomous Status) मिळाला असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 च्या शिफारशीनुसार अभ्यासक्रमाची रचना.
- रोजगार व उच्च शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणारी संस्था.
- शिक्षण संस्थेच्या औद्योगिक आस्थापनांशी असलेल्या सामंजस्यावर आधारित राष्ट्रीय स्तरावरील AICTE- CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास ६ वेळा 'Platinum Category' (सर्वोत्कृष्ट दर्जा) प्राप्त.
- सहा विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील उच्च श्रेणी प्राप्त सर्वात मोठी शिक्षणसंस्था.
- अभिजात भारतीय कला जोपासणारी ललितकला व प्रयोगशील कला शिक्षण महाविद्यालये.
- विद्यार्थी विकास केंद्रित शिक्षणावर भर देणारी शिक्षणसंस्था.
- AICTE - Idea Lab साठी अनुदान मिळविणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय.

## New Programs :

- Artificial Intelligence & Data Science (Under Engineering)
- Robotics & Automation (Under Engineering)
- Computer Science & Design (Under Engineering)
- Artificial Intelligence & Machine Learning in Polytechnic.
- Diploma in Pharmacy in Degree Pharmacy Institute.
- BVA (Painting & Sculpture) in Fine Arts College
- B.Sc. (Cyber & Digital Science), M.Sc. (Microbiology) (Under Senior College, Nashik)

लोकमत

वर्धापनदिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

**श्री. समीर बी. वाघ**

(अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व आजी/माजी विद्यार्थी

**Constituents of K. K.Wagh Education Society**

Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA | MCA | Fine & Performing Arts | College of Arts, Commerce, Science & Computer Science |CBSE & SSC Schools


सकाळ

# वजन घटविण्यासाठी नैसर्गिक पद्धतीचा अवलंब करावा

## डॉ. जगन्नाथ दीक्षित : (कै.) बाळासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ३१ : वजन कमी करण्यासाठी नैसर्गिक पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे शारीरिक हाल करु नये. त्याचप्रकारे वजन नियंत्रित ठेवण्यासाठी दिवसातून दोन वेळा जेवण करावे. एकदा जेवण करताना ५५ मिनिटांच्या आत पोटभर जेवण करावे, असे प्रतिपादन प्रसिद्ध आहारतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब वाघ यांचे ६ फेब्रुवारी २०२२ ला निधन झाले. शिक्षण, सहकार, साहित्य, संस्कृती, संगीत, लोककला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आमंत्रित केले जात असते.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे या उपक्रमाचे नववे पुष्प डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी 'जीवनशैली बदलातून स्थूलता व मधुमेह निवारण' या विषयावर सोमवारी (ता. २९) गुंफले. शालिमार येथील कालिदास कलामंदिर येथे पार पडलेल्या व्याख्यानमालेस समाजातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अतुल वडगावकर होते. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर संस्थेचे विश्वस्त शकुंतला वाघ यांचे हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. जगन्नाथ दीक्षित म्हणाले, की सलग तीन महिने दिवसातून दोन वेळा जेवण केल्याने साधारण आठ किलो वजन कमी होऊ शकते व मधुमेह नियंत्रणात येतो. तसेच जेवणात कार्बोहायड्रेटचे प्रमाण करून प्रोटिनचे प्रमाण जास्त असावे. हा सर्व डाएट डॉ. श्रीकांत जिचकर यांच्या मार्गदर्शनाने सुरू केली असल्याचे सांगितले. पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी केले. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी केले. डॉ. सुनील कुटे यांनी कार्यक्रमाचे संयोजक म्हणून कामकाज पाहिले.




नाशिक : (कै.) बाळासाहेब वाघ स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना डॉ. जगन्नाथ दीक्षित.

पुढारी

# वजन, मधुमेह नियंत्रणासाठी दिवसातून दोन वेळा जेवण करा

**• के. के. वाघ संस्था आयोजित व्याख्यानमालेत डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचा सल्ला**

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

वजन कमी करण्यासाठी नैसर्गिक पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. सलग तीन महिने दिवसातून दोन वेळा जेवण केल्याने साधारण आठ किलो वजन कमी होऊ शकते व मधुमेह नियंत्रणात येऊ शकतो. म्हणून वजन नियंत्रित ठेवण्यासाठी दिवसातून दोन वेळा जेवण करण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी दिला.



के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कालिदास कलामंदिरमध्ये आयोजित व्याख्यानमालेचे नववे पुष्प गुंफताना ते बोलत होते. जीवनशैली बदलातून स्थूलता व मधुमेह निवारण याबद्दल दीक्षित म्हणाले, निरोगी आरोग्यासाठी आहार महत्वाचा आहे. जेवणात कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी करून प्रोटिन्सचे प्रमाण अधिक वाढवावे. जेवण करताना ५५ मिनिटांच्या आत पोटभर जेवण करावे व त्यानंतर दिवसभर केवळ द्रव पदार्थांचे सेवन करावे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अतुल वडगावकर होते. संस्थेच्या विश्वस्त शकुंतला वाघ यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविक, डॉ. सुनील कुटे यांनी संयोजन, तर स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले.

My Nashik Edition
Feb 2, 2024 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# वाघ शिक्षण संस्थेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ४ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, के. के. वाघ तंत्रनिकेतन व वाघ फार्मसी महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार झाले. अभियांत्रिकी महाविद्यालयात मॅफिक, तंत्रनिकेतनमध्ये 'स्पंदन' व फार्मसी महाविद्यालयाकडून 'स्पर्श २०२४' चे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेत २७ जानेवारीला मॅफिक स्नेहसंमेलनाने प्रारंभ करण्यात आला. अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे २७ ते ३१ जानेवारीदरम्यान पार पडलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. २७ जानेवारीला आर्ट कॉम्पिटिशन (रांगोळी, चित्रकला) पोस्टर प्रेझेंटेशन, ओपन माइक व २९ ला नक्षत्रांचे देणे हा मराठी संगीताचा कार्यक्रम, कॅरेक्टर डे , ३० जानेवारीला ग्रुप डे, कॉर्पोरेट डे / साडी डे व लेझीम परफॉर्मन्स तर ३१ जानेवारीला ट्रेडिशनल डे, पर्सनॅलिटी कॉन्टेस्ट आणि सांस्कृतिक कार्यक्रम गाणी, डान्स, नाटक व फॅशन शो आदी कार्यक्रम सादर करण्यात आले.

या संमेलनात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कला कौशल्याचे सादरीकरण केले. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारीला तंत्रनिकेतनचे स्नेहसंमेलन पार पडले. १ फेब्रुवारीला फार्मसी महाविद्यालयाचे डे व २ फेब्रुवारीला सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ,



नाशिक : वाघ अभियांत्रिकीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात नृत्य सादर करताना विद्यार्थी.

अरविंद पाटील, पल्लवी पांडे, प्रशांत खानोलकर, प्रा. चंद्रहास हलाई, गणेश खेलुकर, निखिल तलवार, स्नेहा घाटमाळे, माजी प्राचार्य डॉ. वसंत बर्वे, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, प्राचार्य पी. टी. कडवे व डॉ. के. एस. साळुंके आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. विलास मत्सागर, योगेश गायधनी, सुनील सांगळे, डॉ. प्रशांत शिरोडे यांनी स्नेहसंमेलन म्हणून कामकाज पाहिले. कार्यक्रम यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त मंडळ व सचिव प्रा. के. एस. बंदी यांचे मार्गदर्शन लाभले.

# वाघ संस्थेचे स्नेहसंमेलन

▸▸ नाशिक । दि. ४ प्रतिनिधी

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, के के वाघ तंत्रनिकेतन, व के. के. वाघ फार्मसी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

मॅफिक स्नेहसंमेलनाने उत्सवाला सुरुवात करण्यात आली. यात रांगोळी ,चित्रकला, पोस्टर प्रेझेंटेशन, ओपन माइक, नक्षत्रांचे देणे हा मराठी संगीत कार्यक्रम, कॅरेक्टर डे, ग्रुप डे, कॉर्पोरेट डे, साडी डे, लेझीम परफॉर्मन्स, ट्रेडिशनल डे, पर्सनॅलिटी कॉन्टेस्ट, गाणी, डान्स, नाटक व फॅशन शो आदी कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमास जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, अरविंद पाटील, पल्लवी पांडे, माजी विद्यार्थी प्रशांत खानोलकर, प्रा.चंद्रहास हलाई, गणेश खेलुकर, निखिल तलवार, स्नेहा घाटमाळे, माजी प्राचार्य डॉ. वसंत बर्वे, प्राचार्य डॉ. के एन नांदुरकर, प्राचार्य पी. टी. कडवे व डॉ. के. एस. साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा.डॉ.विलास मत्सागर, योगेश गायधनी, सुनील सांगळे, डॉ. प्रशांत शिरोडे यांनी स्नेहसंमेलनाचे कामकाज पाहिले. कार्यक्रम यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सर्व विश्वस्त मंडळ व सचिव प्रा.के.एस.बंदी यांचे मार्गदर्शन लाभले.



सकाळ


प्रेरणास्थान



पद्मश्री कर्मवीर (कै.) काकासाहेब वाघ

# K. K. WAGH EDUCATION SOCIETY

Central Office : Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, Nashik- 03
Ph. No. (0253) 2221109, 2221111, 2221120
Email : disp-co@kkwagh.edu.in Website : www.kkwagh.edu.in

द्रष्टा ज्ञानयोगी



(कै.) बाळासाहेब देवराम वाघ



वैशिष्ट्ये :

- गेली ५३ वर्षे गुणवत्तापूर्व शिक्षण प्रदान करणारी संस्था. के.जी. पासून पीएच.डी. पर्यंत विविध शाखांमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध.
- अभियांत्रिकी महाविद्यालयातील सात (७) शाखांना व तंत्रनिकेतनच्या सहा (६) शाखांना NBA कडून मानांकन प्राप्त.
- अभियांत्रिकी महाविद्यालय व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास NAAC, Banglore द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त
- सन २०२२-२३ पासून विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) नवी दिल्लीकडून अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा (Autonomous Status) मिळाला असून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP २०२० च्या शिफारसींनुसार अभ्यासक्रमाची रचना.
- रोजगार व उच्चशिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणारी संस्था. शिक्षण संस्थेच्या औद्योगिक आस्थापनांशी असलेल्या सामंजस्यावर आधारित राष्ट्रीय स्तरावरील AICTE-CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास ४ वेळा 'Platinum Category' (सर्वोत्कृष्ट दर्जा) प्राप्त.
- सहा विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी संस्था
- अभिजात भारतीय कला जोपासणारी, 'ललित कला व प्रयोगजीवी कला शिक्षण' महाविद्यालये.
- विद्यार्थी विकास केंद्रीत शिक्षणावर भर देणारी संस्था.
- AICTE - Idea Lab साठी अनुदान मिळविणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय.





लोकप्रिय दैनिक 'सकाळ'च्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -

**श्री. समीर बी. वाघ**

अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक
विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि आजी व माजी विद्यार्थी

## FOLLOWING NEW PROGRAMS HAVE STARTED RECENTLY

- Artificial Intelligence & Data Science (Under Engineering)
- Robotics & Automation (Under Engineering)
- Computer Science & Design (Under Engineering)
- Artificial Intelligence & Machine Learning (In Polytechnic)
- Diploma in Pharmacy (in Degree Pharmacy Institute)
- BVA (Painting & Sculpture) (In Fine Arts College)

## CONSTITUENTS OF K. K. WAGH EDUCATION SOCIETY

ENGINEERING | AGRICULTURE | POLYTECHNIC | PHARMACY | MBA | MCA | FINE & PERFORMING ARTS
COLLEGES OF ARTS, COMMERCE, SCIENCE & COMPUTER SCIENCE | CBSE & SSC SCHOOLS

सकाळ

# गुणवत्ता व रोजगाराची सर्वोत्तम संधी
# के. के. वाघ शिक्षण संस्था



समीर बाळासाहेब वाघ,
अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

**पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने १९७० साली के. के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना झाली. केजी ते पी.एचडीपर्यंतचे शिक्षण देणारी संस्था होय. वर्तमान परिस्थितीत के. के. वाघ शिक्षण संस्था जिल्ह्यातील अग्रेसर, गुणवत्ता व विद्यार्थी विकास केंद्रीय शिक्षणावर भर देणारी शिक्षण संस्था म्हणून नावारूपास आली आहे. गेल्या ५२ वर्षांमध्ये संस्थेने अभियांत्रिकी, तंत्रशिक्षणाच्या विकासावर लक्ष केंद्रित करून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्रातच नव्हे तर देश पातळीवर गुणवत्तापूर्ण संस्था असा नावलौकीक मिळवलेला आहे.**

संस्थेचा विकास अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रापुरता मर्यादित न राहता पारंपारिक शिक्षणाबरोबर फाईन आर्ट्स, परफॉर्मिंग आर्ट्स, शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व कृषीविज्ञान क्षेत्रात विविध सहा महाविद्यालये प्रारंभ करून महाराष्ट्रातील सर्वात मोठी कृषी शिक्षण प्रदान करणारी संस्था म्हणूनही नावारूपास आली आहे. संस्थेअंतर्गत इंग्रजी माध्यमाचे स्टेट बोर्ड व सीबीएसई बोर्ड शाळादेखील आहेत. सध्या संस्थेमार्फत ३० महाविद्यालये, तंत्रनिकेतन, शाळा कार्यान्वित असून २३ हजार विद्यार्थी व एक हजार ९०० शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संस्थेत कार्यरत आहेत. देशात व परदेशात ८० हजाराहून अधिक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत. संस्थेचे दिवंगत अध्यक्ष व प्रेरणास्थान कै. बाळासाहेब देवराम वाघ यांनी स्थापनेपासून विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्ष संस्था खंबीरपणे उभी केली. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), नवी दिल्ली यांच्याकडून स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला. राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद, बंगळूर (नॅक) यांचेकडून 'अ' श्रेणीच दर्जा प्राप्त आहे. राष्ट्रीय स्तरावरील एआयसीटीई-सीआयआय सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास चार वेळा ''सर्वोत्कृष्ट दर्जा' सन्मानित केले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आयडिया लॅबसाठी अनुदान मिळवणारे के. के. वाघ हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय होय. आजमितीस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक अँण्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक, सिव्हिल आणि एमसीए या सात विभागांना एनबीए मानांकन मिळाले आहे.

तंत्रनिकेतनच्या सहा विभागांना एनबीए मानांकन प्राप्त आहे. कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, इन्फॉमिशन टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, केमिकल, सिव्हिल, आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशिन लर्निंग अशा विविध शाखांमध्ये डिप्लोमा प्रदान करणारे तंत्रनिकेतन आहे. 'अॅडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रिअल सेफ्टी' हा औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणारा कोर्सही तंत्रनिकेतनमध्ये उपलब्ध आहे.

संस्थेने कृषी शिक्षणातही कृषी महाविद्यालयांतर्गत कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन व उद्यानविद्या महाविद्यालय अशी ६ महाविद्यालये कार्यरत आहेत. महाराष्ट्रात कृषी शिक्षण देणारी सर्वात मोठी संस्था म्हणून संस्था नावारूपास आली आहे.

आजपर्यंत संगीत, नाट्य, नृत्य यांसारखे कलागुणांना वाव देणारे शिक्षण केवळ मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये उपलब्ध होते. हा समाज विचार संस्थेचे दिवंगत अध्यक्ष (कै.) बाळासाहेब वाघ यांनी मोडीत काढत नाशिकला के. के. वाघ कला अकादमीअंतर्गत फाईन आर्ट्स व परफॉर्मिंग आर्ट्स महाविद्यालय स्थापन करत अभिजात भारतीय कला जोपासली आहे.

संस्थेत मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, गुरुकुल, बँकिंग, व्यायामशाळा, कँटीन, ग्राहक भांडार, पार्किंग, बसव्यवस्था, सुरक्षा विभाग आदी सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेने भाऊसाहेबनगर, काकासाहेबनगर, पिंपळस व चांदोरीला वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांची स्थापना केली असून, यातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेताय.

संस्थेने २०१९-२० वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले. यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम इंद्रधनुष्य, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, पर्यावरणपुरक गणेश कार्यशाळा, स्वच्छता अभियान, वक्त्यांची व्याख्याने, माजी विद्यार्थी मेळावा नोव्हेंबर-२०१९, माजी विद्यार्थी महामेळावा-डिसेंबर २०१९, सी.ई.ओ. मीट २.० आदी उपक्रम राबविले. २०२३ हे पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करत आहोत. त्याअंतर्गत १२५ गुणवंत माजी विद्यार्थी, संस्थेअंतर्गत सेवानिवृत्त कर्मचारी यांचा पुरस्कार समारंभ महाकवी कालिदास कलामंदिर येथे आयोजित केला. आजवर कर्मवीर काकासाहेब वाघ व्याख्यानमालेंतर्गत ७५ पुष्पे शहराच्या विविध कलादालनांमध्ये गुंफण्यात आले. (कै.) बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांचे स्मृती प्रित्यर्थ आजमितीस ८ पुष्पे गुंफण्यात आले. याप्रसंगी सामाजिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील वक्त्यांनी नाशिककरांना मंत्रमुग्ध केले.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलमार्फत २०२२-२३ मध्ये विविध मल्टिनॅशनल उद्योगसमूहातर्फे कॅम्पस ड्राईव्ह झाले. यामध्ये एकूण ५७५ हून अधिक विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली. विद्यार्थ्यांना सर्वाधिक २० लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज तर सरासरी ४.५० लाख रुपयांचे पॅकेजचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाबरोबरच विद्यार्थी केंद्रित विकासावर भर देत रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारी जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणून वाटचाल करत आहेत. असाच गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वारसा जपत खारघर, नवी मुंबई येथे के.के. वाघ इंटरनॅशनल स्कूलच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात पदार्पण करत आहे.

**(शब्दांकन : प्रसाद संजय जगताप, संपर्क अधिकारी, के. के. वाघ शिक्षण संस्था).**

